# M. L. DAHANUKAR COLLEGE OF COMMERCE

## १०. फ्रिशिप व स्कॉलरशिपची नियमावली व सोबत जोडावयाची कागदपत्रे

स्कॉलरशिप व फ्रिशिप फॉर्म ऑन लाईन भरणे आवश्यक आहे. फॉर्म भरण्याचा कालावधी महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर देण्यात येईल. त्यानंतर आलेले फॉर्म स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया विद्यार्थ्यांनी व पालकांनी नोंद घ्यावी.

स्कॉलरशिप व फ्रिशिप फॉर्म वेळेवर न भरल्यास संपुर्ण वर्षाची फी भरावी लागेल याची विद्यार्थ्यांनी व पालकांनी नोंद घ्यावी.

फॉर्म ऑनलाईन भरताना दिलेल्या सुचनेप्रमाणेच भरणे आवश्यक आहे. जर चुकीची माहिती भरल्यास स्कॉलरशिप व फ्रिशिप फॉर्म रद्द झाल्यास किंवा रक्कम कमी मिळाल्यास सर्वस्वी विद्यार्थी जबाबदार असेल.

शासनाच्या धोरणानुसार स्कॉलरशिप व फ्रिशिपच्या नियमात जर काही बदल झाल्यास किंवा देत असलेली फि माफीची सवलत रद्द केल्यास ती विद्यार्थ्यांची जबाबदारी असेल. स्कॉलरशिप व फ्रिशिप देणे सर्वस्वी शासनावर अवलंबून आहे, त्यामुळे असे झाल्यास संपुर्ण फि विद्यार्थ्यांना भरावी लागेल. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या प्रवेश तारखेनंतर ॲडमिशन रद्द करावयाचे असल्यास पूर्ण फी भरावी लागेल.

विद्यार्थ्यांनी सतत महाविद्यालयाच्या कार्यालयाशी व संबंधीत स्टाफ यांच्या संपर्कात राहीले पाहिजे, सर्व सुचनांचे पालन केले पाहिजे व नेहमी नोटीस बोर्डवरील नोटीसांचे वाचन केले पाहिजे.

विद्यार्थ्यांना ७५% हजेरी अनिवार्य आहे. जर हजेरी कमी असेल तर संपुर्ण फि विद्यार्थ्यांना भरावी लागेल.

पुढील तक्त्याप्रमाणे सदर कोर्सेसना प्रवर्गाप्रमाणे फ्रिशिप व स्कॉलरशिप उपलब्ध आहे.

| Courses | Freeship | Scholarship |
|---|---|---|
| B.Com | SC/ST/VJ-NT/SBC/OBC | SC/ST/VJ-NT/SBC/OBC |
| Bachelor of Management Studies | SC/ST | SC/ST |
| B.Com (Accounting & Finance) | SC/ST/VJ-NT/SBC | SC/ST/VJ-NT/SBC/OBC |
| B.Com (Banking & Insurance) | SC/ST/VJ-NT/SBC | SC/ST/VJ-NT/SBC/OBC |
| B.Sc. (Information Technology) | SC / ST | SC / ST |
| B. Com (Financial Market) | SC/ST/VJ-NT/SBC | SC/ST/VJ-NT/SBC/OBC |
| Bachelor of Mass Media | SC/ST/VJ-NT/SBC | SC/ST/VJ-NT/SBC/OBC |
| B.Com / B.M.S. Environmental Mgmt. & Economics | SC / ST | SC / ST |
| M.Sc. (IT) | SC / ST | SC / ST |

*Social Welfare Department will sanction OBC Scholarship to those students who apply for it.

** And students from OBC category will get half the admission fees for BMM course.

# M. L. DAHANUKAR COLLEGE OF COMMERCE

## फ्रिशिप व स्कॉलरशिप अर्ज भरण्यासाठी जोडावयाची कागदपत्रे

**स्कॉलरशिप फॉर्म सोबत आवश्यक कागदपत्रे (दोन सेट सत्यप्रतीत (True Copy)**

(ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न SC साठी २,००,०००/-, पेक्षा कमी आहे, ST साठी २,५०,०००/- पेक्षा कमी आहे व VJ, NT, SBC, OBC साठी १,००,०००/- पेक्षा कमी आहे असे विद्यार्थी स्कॉलरशिपला पात्र आहेत.)

१. जातीचा दाखला (जे प्रवर्ग महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार लाभार्थी असतील)
२. पालकांचा कलेक्टर ऑफिसमधून मिळणारा वार्षिक उत्पन्नाचा दाखला (मार्च २०१९ पर्यंत वैध असलेला)
३. बँक पासबुकची बाहेरील व आतील पानाची झेरॉक्स (फक्त युनियन बँक (भोगले चौक, विलेपार्ले पुर्व) शाखेतच खाते काढावे.)
४. दहावी व बारावीच्या मार्कशिटची सत्यप्रत.
५. शिधापत्रिकेच्या पुढील व मागील पानाची सत्यप्रत.
६. शिक्षणात खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट.
७. पालकांचा मृत्यु झालेला असल्यास मृत्युचे प्रमाणपत्र.
८. दोन पेक्षा अधिक अपत्य असतील तर प्रतिज्ञापत्र.
९. शिक्षणासाठी नातेवाईकांकडे राहत असल्यास प्रतिज्ञापत्र.
१०. आधार कार्ड - (विद्यार्थ्यांचे आधार कार्ड आवश्यक)
११. २०१७-१८ च्या मुलांनी फ्रिशीप किंवा बँकेशी संलग्न असणे अनिवार्य आहे.
१२. बँक अकाऊंट आधार सिडींग स्लीप.
१३. एस.टी. प्रवर्गाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आणि डोमिसाईल सर्टीफिकेट आवश्यक.
१४. आधिवास प्रमाणपत्र **(Domicle) [(SC / OBC / SBC / NT, VJ)** यांच्या करिता]

**फ्रिशिप फॉर्म सोबत आवश्यक कागदपत्रे (दोन सेट सत्यप्रतीत (True Copy)**

(ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न SC साठी २,००,०००/-, पेक्षा जास्त आहे, ST साठी २,५०,०००/- पेक्षा जास्त आहे व VJ, NT, SBC साठी १,००,०००/- पेक्षा जास्त व ४,५०,००० पर्यंत उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांना फ्रिशिप पात्र आहेत.)

१. जातीचा दाखला (जे प्रवर्ग महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार लाभार्थी असतील).
२. पालकांचा कलेक्टर ऑफिसमधून मिळणारा वार्षिक उत्पन्नाचा दाखला (मार्च २०१९ पर्यंत वैध असलेला) किंवा **OBC, SBC, NT, VT, ST.**
३. नॉन क्रिमीलेयर सर्टिफिकेट (VJ, NT, SBC, करीता) २०१८ पुढील तीन वर्ष वैध असलेला असावा.
४. बँक पासबुकची बाहेरील व आतील पानाची झेरॉक्स (फक्त युनियन बँक (भोगले चौक, विलेपार्ले पुर्व) शाखेतच खाते काढावे.)
४. दहावी व बारावीच्या मार्कशिटची सत्यप्रत.
५. शिधापत्रिकेच्या पुढील व मागील पानाची सत्यप्रत.
६. शिक्षणात खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट.
७. पालकांचा मृत्यु झालेला असल्यास मृत्युचे प्रमाणपत्र.
८. दोन पेक्षा अधिक अपत्य असतील तर प्रतिज्ञापत्र.
९. शिक्षणासाठी नातेवाईकांकडे राहत असल्यास प्रतिज्ञापत्र.
१०. आधार कार्ड - (विद्यार्थ्यांचे आधार कार्ड आवश्यक)
११. २०१७-१८ च्या मुलांनी फ्रिशीप किंवा बँकेशी संलग्न असणे अनिवार्य आहे.
१२. बँक अकाऊंट आधार सिडींग स्लीप.
१३. एस.टी. प्रवर्गाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आणि डोमिसाईल सर्टीफिकेट आवश्यक.
१४. आधिवास प्रमाणपत्र **(Domicle) [SC / OBC / SBC / NT, VJ)** यांच्या करिता]

# M. L. DAHANUKAR COLLEGE OF COMMERCE

## जातीचे दाखले माहिती पत्रक

**वास्तव्याचे पुरावे खालीलप्रमाणे असल्यास तहसिलदार या कार्यालयात अर्ज करावा.**

१) अनुसुचीत जाती (SC/ST) दिनांक १०-०८-१९५० २) विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) दिनांक २१-११-१९६१
३) इतर मागासवर्ग (OBC) दिनांक १३-१०-१९६७ ४) विशेष मागास प्रवर्ग (SBC) दिनांक १३-०६-१९९५

१) वडीलांचा मुळ गांवचा सक्षम अधिका-याने दिलेला जातीचा दाखला. (अन्य राज्यातील उमेदवारांकरीता हा दाखला आवश्यक आहे.)
२) वडील, काका आत्या, आजोबा यांच्या शाळेच्या दाखल्यात जातीची नोंद हवी व वडीलधा-यांचा जातीचा दाखला.
३) तलाठी / सरपंच व पोलीस पाटील यांचेकडील जात दर्शविणारे दाखले.
४) उमेदरावाचा शाळेचा दाखला, बोनाफाईड, जन्मदाखला. ५) शिधावाटपपत्रीका ६) समाजाचा दाखला.
७) रु. २०/ च्या कोर्टाच्या स्टॅम्प पेपरवर नाव, पत्ता, जात व रहिवास उमेदवाराच्या शाळेच्या दाखल्यात पोटजातीचा नोंद नसलेबाबत :/असलेबाबत व इतर माहितीबाबतचे कोर्टाचे पतिज्ञापत्र.
८) अर्जदाराचे वरीलप्रमाणे वास्तव्य दर्शविणारे सरकारी पुरावे (लाईट बिल, शिधावाटप पत्रीका, पॉलीसी, रेडीयो लायसन्स, निवडणूक दाखला, दस्तऐवज, भाडेपावती इ)
९) विहित नमुन्यातील पूर्णपणे भरलेला अर्ज रु. ५/- कोर्ट फी स्टॅम्पसह.

**टीप : अर्जासोबत जोडलेल्या सर्व झेरॉक्स प्रति विशेष कार्यकारी अधिकारी (SEO) राजपत्रीत अधिकारी यांनी साक्षांकीत करुन मुळ कागदपत्रे अर्ज देतेवेळी तपासणीसाठी सादर करावयात.**

## नॉन क्रिमिलेअर (प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याबाबत) दाखल्याचे माहिती पत्रक

वास्तव्याचे पुरावे खालीलप्रमाणे असल्यास तहसिलदार या कार्यालयात अर्ज करावा.

**अर्जासोबत जोडावयाचे पुरावे.**

१) विहित नमुन्यात पूर्ण भरलेला अर्ज रु. ५/- कोर्ट फी स्टॅम्पसह (राज्य व केंद्रशासनासाठी वेगवेगळ्या विहित नमुन्यात)
२) उमेदवाराचा जातीचा दाखला.
३) उमेदवाराचा शाळा सोडल्याचा दाखला / बोनाफाईड.
४) अर्जदाराच्या / उमेदवाराच्या कुटुंबाचे मागिल तीन वर्षाचे उत्पन्न.
   १) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र
   २) सक्षम अधिका-याकडील चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.
   ३) नगरसेवकाकडून मिळालेला पालकांचा उत्पन्नाचा दाखला.
   ४) खाजगी नोकरी असल्यास संबंधीत आस्थापनेकडील / कंपनीकडील मागील तीन वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.
   ५) वास्तव्याचा पुरावा (शिधावाटप पत्रीका, लाईटबिल, भाडेपावती ई)
   ६) मागील तीन वर्षाचे कुटुंबाचे उत्पन्न नमूद केलेले कोर्टाचे प्रतिज्ञापत्र.

टीप : अर्जासोबत जोडलेल्या सर्व झेरॉक्स प्रति विशेष कार्याकारी अधिकारी (S.E.O) राजपत्रीत अधिकारी यांनी साक्षांकीत करुन मुळ कागदपत्रे अर्ज देतेवेळी तपासणीसाठी सादर कराव्यात.